# INVOLVEMENT OF VOLUNTARY AGENCIES

2.114 There is a good deal of voluntary effort in India, especially in the field of social welfare. The tendency so far has been to equate the work of voluntary agencies with only welfare activities and charity work. Involvement of other agencies in the non-government sector, such as trade unions, co-operativeand Panchayati Raj bodies, has tended to blur the identity of these which can be strictly defined as voluntary organisations. There has been inadequate recognition of their role in accelerating the process of social and economic development. These agencies have been known to play an important role by providing a basis for innovation with new models and approaches, ensuring feedback and securing the involvement of families living below the poverty line. Therefore, during the Seventh Plan, serious efforts will be made to involve voluntary agencies in various development programmes, particularly in the planning and implementation of programmes of rural development. Voluntary agencies have developed expertise and compete in many non-traditional areas to plan their own schemes instead of expecting Government to do so. More specifically, the role of voluntary agencies in the implementation of development

(i) To supplement government effort so as to offer the rural poor choices and alternatives;

(ii) To be the eyes and care of the people at the village level;

(iii) To set an example. It should be possible for the voluntary agency to adopt simple, innovative, floxible and inexpensive menas with its limited resources to reach a larger number with lose overheads and with greater community participation.

(iv) To activate the delivery system and to make it effective at the village level to respond to the felt needs of the poorest of the poor;

(v) To disseminate information;

(vi) To make communities as self-reliant as possible;

(vii) To show how village and indigenous resources could be used, how human resources, rural skills and local knowledge, grossly under-utilised at present, could be used for their own development.

(viii) To demystify technology and bring it in a simpler form to the rural poor

(ix) To train a cadre of grassroot workers who believe in professionalising volunteerism;

(x) To mobilise financial resources from within the community with a view to making communities stand on their own feet;

(xi) To mobilise and organise the poor and generate awareness to demand quality services and impose a community system of accountability on the perfermance of village-level government functionaries.

2.115 Voluntary agencies are essentially non-profit and non-partisan organisation. The criteria for identifying voluntary agencies for enlisting help in relation to the rural development programmes can be follows:

(i) The organisation should be a legel entity.

(ii) It should be based in a rural area and be working there for a minimum of 3 years.

(iii) It should be broad-based objectives serving the social and economic needs of the community as a whole and mainly the weaker sections. It must not work for profit but on 'no profit and no lose basis'.

(iv) Its activities should be open to all citizens of India irrespective of religion, caste, creed, sex or race.

(v) It should have the necessary flexibility, profesaional competence and organisational skills to implement programmes.

(vi) Its office bearers should not be elected members of any political party.

(vii) It declares that it will adopt constitutional and non-violent means for rural development purposes.

(viii) It is committed to secular and democratic concepts and methods of functioning.

2.116 In order to assist and support voluntary agencies in the implementation of anti-poverty and Minimum Needs Programme, there is need for a consolidated approach in the field of social welfare and social services, that is, for conventional voluntary agencies there is already the Central Social Welfare Board with their State branches. For instegrated rural development and allied services covered by the anti-poverty and Minimum Needs Programme in the Seventh Plan period there is need to enlarge the function and scope of People's Action for Development (India): PADI.

2.117 The accent in the Seventh Plan will be to professionalise volunteerism, to introduce professional competence (delinked from degrees) and managerial expertise in keeping with the resources and capabilities of voluntary agencies to be in a position to meet the basic requirements of government in terms of account-ability. Voluntary agencies, hwoever, will need to give greater attention to mobilise locally available human and financial resources, identify people in the poorer and vulnerable occupations like farmers, rural artisans, scheduled castes and scheduled tribes, agricultural labourers, girijans and bonded labourers, upgrade their skills and give them the tools to make them economically self-sufficient as well as productive.

2.118 There has to be mutual trust and understanding between government and voluntary agencies at the village level. If at the higher levels there is general indifference to voluntary agencies, at the village level there is often open hostility. For want of an estahlished forum where voluntary agencies could be given an opportunity to explain their position and defend themselves or bring field problems to the notice of the State Governments, the situation that now prevails is not conducive to full participation of voluntaru agencies.

2.119 The need to establish a regular forum was felt during the Sixth Plan period when the late Prime Minister in October 1982 wrote to all the Chief Ministers that Consultative Groups of voluntary agencies must be established at the State level. It is hoped that during the Seventh Plan period such Consultative Groups will be established in all States and given Central level, voluntary effort in the rural development sector with its allied services is promoted on a much larger scale with greater responsibilities through PADI and such other bodies as may be established. The State level Consultative Groups recommended by the late Prime Minister headed by either the Chief Secretary or the Development Commissioner should be registered under the Societies Registration Act as Peoples Action for Development (PAD).

2.120 For voluntary effort to succeed, guidelines will be formulated to minimise dealaya and harasement by frequent reference of project proposals to various government (Central and State) departments/agencies. PAD should prepare a panel of experts available in the voluntary sector in different States/Districts who are prepared to assist on a professional and consultancy basis in the planning and implementation of anti-poverty and minimum needs programmes through voluntary agencies. There are officials in the Central and State Government who are been to offer their services and experience to upgrade professionalisn in the voluntary sect r. Suitables steps will be taken to facilitate this. Professional and consultency services to voluntary agencies could also include these by retired personnel and ex-servicemen.

2.121 The programmes and areas in which the participation of voluntary agencies can be of great help for better implementation of anti-poverty and minium needs programmes are :

(i) Integrated Rural Development/Rural Landlese Employment Guarantee Programme TRYSEM;

(ii) Implementation of land ceiling and distribution of surplus land;

(iii) Enforcement of minimum wages to agricultural labourers;

(iv) Identification and rehabilitation of bonded labour;

(v) Development of scheduled castes and scheduled tribes;

(vi) Supply of safe drinking water : repair and maintenance of water supplysystems with community support;

(vii) Afforestation social forestry, development of biogas and alternative energy sources (solar and wind energy, improved chulas):

(viii) Promotion of family planning;

(ix) Primary health care; control of leprosy, TB, blindness; preventive health programmes using village resources;

(x) Programmes for women and children in rural areas;

(xi) Innovative methods and low-cost alternatives in elementary, primary and middle school education for children, adult education and non-formal and informal education;

(xii) Consumer protection : promotion of co-operatives;

(xiii) Promotion of handicrafts and village and cottage industries;

(xiv) Promotion of science and technology;

(xv) Legar education;

(xvi) Rural housing : imporvement of rural slums;

(xvii) Environmental and ecological improvement; and

(xviii) Promotion and encouragement of traditional media for dissemination of information.

2.122 The human resource available in the training infrastructure of voluntary agencies need to be mobilised and used more effectively at the village level in the Seventh Plan period. The non-formal and informal skills, methods and approaches of building confidence among the rural

poor to undertake responsibilities of planning and implementing programmes on their own, that training institutions in the voluntary sector have developed, needs to be considered for replication on a larger scale.

2.123 There is need for voluntary agencies to decide on a code of conduct to be applioable to these agencies receiving government funds.

2.124 It is proposed that about Rs.100/- - 150/- crores of Plan expenditure in the Central and State sectors on the programmes listed above may be earmarked for us in active collaboration with earmarked for use in active collaboration with voluntary agencies. This involvement could take many forms. In certain cases a programme or some of its components could be implemented directly by the voluntary agency in a specified area. In certain others they could participate in the process of planning, mobilisation, monitoring and evaluation and evaluation and be assisted by suitable grants-in-aid. These and other modalities of involvement would very from case to case but the intention is to ensure that the financial target given above is realised on a national scale.

TABLE 2.5

Summary Table of the Outlays for Rural Development Programme

Centre, States and UTs

| | Seventh Plan Outlay | | | |
|---|---|---|---|---|
| | Total | Centre | States | Uts |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| Integrated Rural Development and Related Programme | 3473.99 | 1864.38* | 1609.61 | - |
| National Rural Employment Programme | 2487.47 | 1250.81 | 1236.66 | - |
| Community Development and Panchayati Raj Institutions | 416.15 | - | 396.30 | 19.85 |
| Special Employment Programmes | 509.24 | - | 509.24 | - |
| Rural Landless Employment Guarantee Programme | 1743.78 | 1743.78 | - | - |
| Land Reforms | 395.83 | 36.71 | 353.88 | 5.24 |
| Integrated Rural Energy Programme | 47.76 | 5.91 | 37.15 | 4.70 |
| TOTAL : | 9074.22 | 4901.59 | 4142.84 | 29.79 |

* Includes Rs.245/- crores for Desert Development Programme.

मसुदा विधेयक

## ग्रामीण स्वयंसेवी संस्थांची परिषद, १९८६

### १९८६ चा कायदा

ग्रामीण स्वयंसेवी संस्थांची राज्यस्तरीय व केंद्रीय परिषद स्थापन करण्याची तरतूद करणारा कायदा.

उद्देशिका [भूमिका]

ग्रामीण विकासातील स्वयंसेवी संस्थांच्या भूमिकेस बळकटी आणण्यासाठी, ग्रामीण स्वयंसेवी संस्थांच्या राज्यपरिषदा [कौंसिल] आणि ग्रामीण स्वयंसेवी संस्थांची राष्ट्रीय परिषद [कौंसिल] स्थापन करण्याची आवश्यकता लक्षात आल्यामुळे, भारतीय गणराज्याच्या ३६ व्या वर्षात, लोकसभेने त्याची प्रस्थापना अधिनियमित करावी.

१. संक्षीप्त शीर्षक, व्याप्ती आणि प्रारंभ

१. हया विधेयकास ग्रामीण स्वयंसेवी संस्थांची परिषद [कौंसिल] विषयक विधेयक[ ९८६] असे म्हणावे,

२. हयाची व्याप्ती संपूर्ण भारत राहील.

३. केंद्र सरकारने शासकीय राज्यपत्रिकेत अधिसुचीत केलेल्या तारखेस, हे विधेयक सर्व राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशासाठी अस्तित्वात येईल. हया विधेयकातील तरतुदींसाठी वेगवेगळया तारखा असू शकतील.

२. व्याख्या

१. "नियत दिवस" म्हणजे विशिष्ट तरतूद अस्तित्वात येण्याचा दिवस.

२. "स्वयंसेवी संस्थांची राष्ट्रीय परिषद" [कौंसिल] म्हणजे विधेयकाची व्याप्ती असलेल्या प्रदेशांसाठी कलम ५ अन्वये अस्तित्वात आलेली परिषद [कौंसिल].

३. "विहीत" म्हणजे हया विधेयकातील नियमांप्रमाणे पिहित केलेले.

४. "यादी" म्हणजे राज्य व केंद्र शासीत प्रदेश स्तरावर तयार व नियमित केलेली ग्रामीण स्वयंसेवी संस्थांची यादी.

५. "ग्रामीण स्वयंसेवी संस्था" म्हणजे [अ] संस्था नोंदणी कायदया-प्रमाणे नोंदलेली अथवा विश्वस्त मंडळ कायदयाप्रमाणे नोंदलेली अथवा कंपनी नोंदणी कायदयाप्रमाणे नोंदलेली नफा तत्वावर काम करणारी संस्था. [ब] ज्याचे कार्य धर्म, जात, व लिंग निरपेक्ष असून सर्वांसाठी खुले आहे, अशा संस्था. [क] महानगर, नगर परिषद, शहर हयांच्या कार्यक्षेत्राबाहेर काम करणारी संस्था.

६. "ग्रामीण स्वयंसेवी संस्थांची राज्य परिषद" म्हणजे एखादया राज्यासाठी अथवा केंद्र शासीत प्रदेशासाठी अस्तित्वात आलेली परिषद.

३. राज्य परिषद

[अ] कलम १ खंड ३ अन्वये अस्तित्वात असलेल्या प्रत्येक राज्य व केंद्र शासीत प्रदेशासाठी ग्रामीण स्वयंसेवी संस्थांची राज्य परिषद असेल

[ब] विहीत नमुन्याप्रमाणे केलेल्या अर्जानुसार राज्य परिषद ही राज्यातील सर्व ग्रामीण स्वयंसेवी संस्थांची मिळून बनलेली असेल.

[क] नोंदणी झालेली प्रत्येक ग्रामीण स्वयंसेवी संस्था राज्य परिषदेची सभासद असू शकेल. परंतु मान्यता, पैसा व कार्य करण्यासाठी हया परिषदेचे सभासद होण्याची सक्ती केली जाणार नाही.

[ड] राज्य परिषदेची वर्षातून किमान एक सभा होईल.

४. कार्यकारी समिती

[अ] ग्रामीण स्वयंसेवी संस्थांच्या राज्य परिषदेची एक कार्यकारी समिती असेल. कार्यकारी सदस्य संख्या राज्य परिषद ठरवेल.

[ब] कार्यकारी समितीत राज्य शासनास खालील पैकी तीन सभासद नेमता येतील. -

१. मुख्य सचिव
२. विकास आयुक्त
३. सचिव, ग्रामीण विकास
४. सचिव, समाज कल्याण अथवा आदिवासी कल्याण
५. सचिव, वन व पर्यावरण
६. सचिव कृषि
७. सचिव, मजूर
८. सचिव, आरोग्य
९. सचिव, शिक्षण
१०. सचिव, पी. एच. डी.
११. मुख्य अधिकारी, पाडी

[क] राज्य परिषदेच्या सभासद संस्था कार्यकारी समितीचे इतर सदस्य निवडतील.

[ड] कार्यकारी समितीचे सभासद कार्यकारीणीवर निवडून आलेल्या सभासदातून अध्यक्ष, खजिनदार आणि सचिवाची निवड करतील.

[इ] कार्यकारी समितीची वर्षातून किमान एक सभा होईल.

[फ] कार्यकारी समितीची मुदत ३ वर्षे असेल आणि पुढील कार्यकारी समिती तयार होईपर्यंत ती काम पाहील.

## ५. राष्ट्रीय परिषद

[अ] ग्रामीण स्वयंसेवी संस्थांची एक राष्ट्रीय परिषद असेल.

[ब] राज्य परिषदेच्या कार्यकारी समितीने निवडलेले सभासद आणि केंद्र सरकार नियुक्त प्रतिनिधी ह्यांची मिळून राष्ट्रीय परिषद बनेल.

[क] ३०० पर्यंत संस्था सदस्य संख्या असलेली राज्य परिषद एक प्रतिनिधी आणि ३०० हून अधिक सदस्य संख्या असलेली राज्य परिषद २ प्रतिनिधी राष्ट्रीय परिषदेवर निवडून देईल.

[ड] राज्य परिषदांनी निवडून दिलेले प्रतिनिधी स्वयंसेवी संस्था सदस्य असतील. शासन नियुक्त राज्य परिषद प्रतिनिधी राष्ट्रीय परिषदेवर निवडला जाणार नाही.

[इ] केंद्र सरकार खालील खात्यामधील कोणही पांच व्यक्तीस राष्ट्रीय परिषदेवर नियुक्ती करेल आणि त्याचा दर्जा सह-सचिवाच्या खालचा असणार नाही.

१. महिला कल्याण
२. ग्रामीण विकास
३. अन्न व नागरी पुरवठा
४. वने व पर्यावरण
५. मजूर
६. अनुसुचीत जाती व जमातीसंबंधीत खाते
७. आरोग्य व कुटुंब कल्याण
८. कायदा व सुव्यवस्था

[ई] राष्ट्रीय परिषदेची वर्षातून किमान दोन वेळा सभा होईल.

[फ] विहित केलेल्या पध्दतीनुसार ग्रामीण स्वयंसेवी संस्थांची राष्ट्रीय परिषद परिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सरचिटणीस आणि खजिनदार निवडेल.

[क] राष्ट्रीय कार्यकारीणीच्या सभासदांची मुदत तीन वर्षे असावी. प्रत्येक सभासद राष्ट्रीय कार्यकारीणीमध्ये दुसरा सभासद निवडला जाईपर्यंत किंवा नेमला जाईपर्यंत पदावर राहील.

[ख] कोणतीही स्वयंसेवी संस्था राष्ट्रीय किंवा राज्य समितीची लागोपाठच्या दोन पेक्षा जास्त सत्रभागामध्ये सभासद राहू शकत नाही.

[ग] केंद्र सरकारने तदर्थ राष्ट्रीय कार्यकारीणी स्थापावी ही कार्यकारीणी निर्वाचन यादया तयार करील व राज्यस्तरावर कार्यकारी समितीची स्थापना करेल. राष्ट्रीय कार्यकारी समितीची रितसर निवड झाल्यावर तदर्थ राष्ट्रीय कार्यकारीणी विसर्जित करण्यात येईल. तदर्थ राष्ट्रीय कार्यकारीणी स्थापन झाल्यानंतर नऊ महिन्यांच्या आत राष्ट्रीय परिषदेच्या कार्यकारी समितीची स्थापना करावी.

६. **परिषद ही बॉडी कार्पोरेट आहे.**

ग्रामीण स्वयंसेवी संस्थांच्या प्रत्येक परिषदेस अखंड उत्तराधिकार असावा. परिषदेचा वैध शिक्का असावा. परिषदेला स्थावर व जंगम मालमत्ता मिळण्याचा व धारण करण्याचा अधिकार, करार करण्याचा अधिकार व दुस-यावर खटला करण्याचा व दुस-याकडून खटला करण्याचा अधिकार असावा.

७. **राज्य परिषदेची कार्ये**

ग्रामीण स्वयंसेवी संस्थांच्या राज्य परिषदेची कार्ये खालीलप्रमाणे असतील.

[अ] ग्रामीण स्वयंसेवी संस्थेला यादीमध्ये समाविष्ट करून घेणे.

[ब] अशी यादी तयार करणे व ती नियमित करणे.

[क] राज्य परिषदेच्या कार्यकारी समितिची निवडणूक आणि राष्ट्रीय परिषदेवर पाठविण्यासाठी प्रतिनिधीची निवडणूक करण्याची तरतूद करणे.

[ड] विलंब, ढवळा-ढवळ अथवा अडवणूकीच्या संदर्भात सरकारी खात्याविरूध्द ग्रामीण स्वयंसेवी संस्थेने केलेल्या तक्रारीची छाननी करणे. सरकारी खात्यामध्ये सरकारने चालविलेल्या संस्था, बँका, सहकारी बँका व इतर सहकारी संस्था, विदयापिठे, शासकीय संशोधन संस्था, स्वायत्त संस्था, पंचायत, जिल्हा परिषद आणि शासकीय अधिकार असलेल्या व्यक्ति समाविष्ट होतात.

[इ] स्वाधिकारात अथवा तक्रारी आल्यावर, ग्रामीण स्वयंसेवी संस्थांची, आर्थिक भ्रष्टाचार, गैरव्यवहार, आचारसंहितेचा भंग इत्यादी बाबतीत चौकशी करणे.

[ई] चौकशीअंती काढलेल्या निष्कर्षावर कार्यवाही करणे.

[फ] सभा, संम्मेलने, भाषणे संघटित करणे.

[ग] आपली उद्दिष्टे साध्य व प्रचलित करण्यासाठी, परिपत्रके नियतकालीके व पुस्तके प्रसिध्द करणे व सामुहिक प्रसार माध्यमाचा उपयोग करणे.

[ह] निधी जमा करणे, देणग्या स्विकारणे, वर्गणी स्विकारणे, अनुदान अथवा मालमत्तेच्या स्वरूपात देणग्या स्विकारणे.

[य] वरील उद्दिष्टे साध्य करण्याकरिता कोणतीही वैध कृती करणे.

[ज] सेवकांची नियुक्ती करणे.

८. राष्ट्रीय परिषदेची कार्ये

ग्रामीण स्वयंसेवी संस्थाच्या राष्ट्रीय परिषदेची कार्ये खालीलप्रमाणे राहतील.

[अ] ग्रामीण स्वयंसेवी संस्थांसाठी आचार संहीता विहित करणे.

[ब] राज्य परिषदेच्या कार्यकारी समित्यांनी चौकशीच्या संदर्भात अनुसार वयाची पध्दती ठरवून देणे.

[क] ग्रामीण स्वयंसेवी संस्थांचे हक्क, अधिकार व हितसंबंध सांभाळणे

[ड] राज्य परिषदांच्या कामकाजावर देखरेख ठेवणे आणि ते नियमित सांभाळणे.

[इ] [७ मधील ८ ड प्रमाणें]

[फ] [७ मधील इ प्रमाणे]

[ग] [७ मधील ई प्रमाणे]

[य] [७ मधील फ प्रमाणे]

[ज] [७ मधील ग प्रमाणें]

[ट] [७ मधील य प्रमाणे]

[ल] [७ मधील ज प्रमाणे]

९. लेखा व लेखा परीक्षा

१. विहित केलेल्या पध्दतीप्रमाणे आणि नमुन्यानुसार प्रत्येक परीषद आपली लेक्षा पुस्तके नियमित करेल.

२. कंपनीं कायदा १९५६ च्या अन्वये मान्यता प्राप्त लेखा-परीक्षाकडून दिलेल्या वेळी व ठरवून दिल्याप्रमाणे परिषदेचे लेखा तपासून घ्यावेत.

३. आर्थिक वर्ष संपल्यानंतर लवकरात लवकर पण ३१ डिसेंबरच्या आंत राज्य परिषदेने लेखाची प्रत व लेखा परीक्षकाच्या अहवालाची प्रत राष्ट्रीय कार्यकारीणीकडे पाठवावी व सदर प्रत राज्य पत्रिकेत प्रसिध्द करावी.

४. आर्थिक वर्ष संपल्यानंतर लवकरात लवकर राष्ट्रीय कार्यकारीणीची लेखा प्रत व लेखा परीक्षकाच्या अहवालाची प्रत केंद्र सरकारकडे पाठवावी व सदर प्रत केंद्र सरकारच्या राजपत्रिकेत प्रसिध्द करावी.

१०. <u>रिक्त स्थानामुळे कृतीची वैधता</u>

परिषदेतील रिक्त स्थानामुळे अथवा घटनात्मक दोषामुळे परिषदेने केलेला नियम अथवा कृती अवैध अथवा रद्दबादल ठरवू नये.

११. <u>निवडणूका</u>

काही विशिष्ट मुदयांवर कार्यकारी समिती व राष्ट्रीय परिषदेस हरकत घेवू नये. राज्य अथवा राष्ट्रीय परिषदेच्या कार्यकारी समितीत निवडून आलेल्या सभासदाच्या अवैधतेबद्दल तो केवळ मतदारांना योग्य सुचना न मिळाल्यामुळे निवडून आला म्हणून हरकत घेवू नये, निवडणूकीची तारीख सरकारी राजपत्रिकेत किमान ३० दिवस अगोदर प्रसिध्द झालेली असावी.

१२. ह्या विधेयकाचे हेतू साध्य करण्याकरिता आवश्यक असलेले नियम बसविण्याचे अधिकार राष्ट्रीय परिषदेला असतील,

१३. <u>आचार संहितेचा मसुदा</u>

[अ] प्रत्येक ग्रामीण स्वयंसेवी संस्थेचे कार्य तिच्या कायदे नियम व कायदेशीर तरतुदींच्या चौकटीत असावे.

[ब] प्रत्येक संस्थेने विहित केल्याप्रमाणे सर्वसाधारण सभा व इतर बैठका वेळेवर घ्याव्यात.

[क] प्रत्येक संस्थेने आपले हिशेब वेळेवर तपासून त्याचे अहवाल संबंधित अधिका-याकडे पाठवावेत.

[ड] सर्व आवश्यक अहवाल व रीटर्नर्स वेळेवर सुपुर्द करण्याची जबाबदारी सर्व संस्थांनी काटेकोरपणे पाळावी.

[इ] परदेशी अर्थ सहाय्य मिळत असल्यास सर्व संस्थांनी एफ्.सी.आर. १९७६ खाली स्वत:ची नोंदणी करून कायदयानुसार विहित नियमाचे पालन करावे.

[फ] संस्थांचे पदाधिकारी व सेवक हयांचे वर्तन अत्युच आदर्शवत असावे. संस्थेचे फायदे स्वत: किंवा इतर नातेवाईकांना मिळणार नाहीत हयाची काळजी घ्यावी.

[ग] पदाधिका-यांचे आर्थिक, धंदेवाईक व राजकीय हितसंबंध जपण्याकरीता संस्था काम करणार नाहीत.

[ह] स्वयंसेवी संस्थेचा पदाधिकारी हा कोणत्याही राजकीय पक्षाचा पदाधिकारी नसेल.

[य] स्वयंसेवी संस्थेचा कोणताही पदाधिकारी लोकसभा, विधानसभा अथवा पंचायत राज संस्थांमध्ये निवडून आलेला प्रतिनिधी नसेल.

[ज] स्वयंसेवी संस्थेचा प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्ता स्वत:ची मिळकत दरवर्षी जाहीर करेल.

[च] संस्थेचा प्रत्येक पदाधिकारी अतिशय साधे आणि आदर्शवत आयुष्य जगेल.

[ल] स्वत:च्या कामात असलेल्या शोषणात्मक पध्दती निपटून काढण्याचा प्रत्येक स्वयंसेवी संस्था सर्वतोपरी प्रयत्न करेल.

[म] ग्रामीण विकासाचे काम करणा-या प्रत्येक स्वयंसेवी संस्थेला ग्रामीण भागातील अस्तित्व आवश्यक आहे.

[न] संस्थांची उद्दिष्टे मुख्यत: समाजाच्या मागासलेल्या विभागाच्या आर्थिक सामाजिक गरजा पूर्ण करणे ही असावीत.

[ट] तिने साध्या नाविन्यपूर्ण आणि स्वस्त अशा साधनांचा वापर करावा.

[प] तिच्या कडे कार्यक्रम राबविण्यासाठी, समर्पण लवचिकता, व्यवसायीक क्षमता आणि संघटन कौशल्य आदि गुण असणे आवश्यक आहे.

[फ़] तिच्या निष्टा वादातीत, धर्मातीत, समाजवादी आणि लोकशाही वादी असाव्यात.

[र] प्रत्येक संस्थेने आपण वैधानिक आणि अहिंसक मार्गाने ग्रामीण विकासाचे काम करू असे जाहीर करावे.

[स] ती गरीबीत राहणा-यांची जाणीव वाढविण्यासाठी गरीबीविरोधी आणि किमान गरजा कार्यक्रम आखणारी आणि राबविणारी असावी.

[ठ] कोणतीही स्वयंसेवी संस्था एखादया व्यक्तिस, ती तर सर्व कायदे आणि नियमांमध्ये बसत बसेल सभासदत्व नाकारणार नाही.

[ण] प्रत्येक स्वयंसेवी संस्था सरकारनियुक्त आयोग अथवा व्यक्तिव्दारे चौकशीस तयार असेल.